ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"IDEAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**IDEAL - ISSN 2319 - 359X - Impact Factor - 6.601** (www.sjifactor.com)

Scanned by CamScanner

# EDITORIAL BOARD


**Mehryar Adibpour**
Faculty of Computing London Metropolitan University, Holloway Road, London.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science, Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Altaf Husain Pandi**
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

**Dr. Ramdas S. Wanare**
Associate Professor & Head Accounts & Applied Stat, Vivekanand Art's Sardar Dalip Sing Commerce & Science College Samarth Nagar, Aurangabad (M.S.)

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. of Computer Science and Applications, Bhavnagar University, India.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd), Dept. of Economics, Shivaji University, Kolhapur - (M.S.) India.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean School for Environment Science, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University of Raebareily, Lucknow- India.

**Dr. Joyanta Barbora**
Head Dept. of Sociology University of Dibrugarh- India.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D., SNJB College of Pharmacy, Neminagar, Chandwad, Nashik (M.S.) - India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. of Physics, University of School of Sciences, Gujarad University, Ahmedabad- India.

**Dr. Memon Ubed Mohd Yusuf**
Asst. Prof. Dept. of Commerce, Sir Sayyed College Aurangabad (M.S.) - India.

**Prof. S. R. Damodar**
Head of Department Political Science Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Dr. P. R. Gawai**
Head of Department Economics, Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Dr. Kailas Wankhade**
Professor, Department of Marathi, Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.


Scanned by CamScanner

# EDITORIAL BOARD


**Dr. D. R. Khanderao**
Dept. of English,
Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Dr. S. K. Keswani**
Head of Department of Hindi,
Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Prof. Bhaskar Dharne**
Head of Department Marathi,
Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Dr. Ashok Sonone**
Librarian, S. A. College, Akola Sitabai Arts,
Commerece & Science College, Akola.

**Dr. B. G. Jogdand**
Dept. of Political Science,
Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.

**Dr. Sunil Gaygol**
Head of Department of Sociology
Sitabai Arts, Commerece & Science College, Akola.



PUBLISHED BY

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)


Scanned by CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा<br>**डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर** | १-५ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांचा : भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास<br>**प्रा. डॉ. दिलीप नि. लांजेवार** | ६-९ |
| ३ | भारतीय संविधान-मानवाधिकार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. प्रतिभा सुरेश जाधव** | १०-१५ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा<br>**डॉ. व्ही. बी. चांदजकर** | १६-१८ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय राज्यघटना निर्मितीतील योगदान<br>**सहा. प्रा. डी. डी. ठाकरे** | १९-२५ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही संबंधी विचार व आजची परिस्थिती<br>**डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे** | २६-३१ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व आर्थिक दृष्टिकोण<br>**प्रा. पवार रामेश्वर भाऊसाहेब** | ३२-३४ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा परामर्श<br>**अमोल पर्वत गरुड** | ३५-३९ |
| ९ | भारतातील जलधोरणाच्या पायाभरनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान व त्यांच्या विचारांची प्रासंगिकता<br>**डॉ. अमोल जगन्नाथ शेंडे**<br>**डॉ. आर. बी. शंभरकर** | ४०-४३ |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक आणि राजकीय दृष्टिकोण<br>**वाघचौरे अशोक भावराव** | ४४-४८ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता<br>**दिलीप आप्पा जगताप** | ४९-५२ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण<br>**अश्विनकुमार अर्जुनराव जोगदंड** | ५३-५७ |




Scanned by CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601** (www.sjifactor.com) AP- 13

# १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक सुधारणा

**डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, म.स.गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प, मालेगाव, जि. नाशिक.

दलितांचे कैवारी, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, क्रियाशील नेता, हिंदू कोड बिल कायद्याचे जनक, शेतकऱ्यांचे कैवारी, डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार हे धार्मिक व नैतिकतेच्या तत्वावर आधारलेले आहेत. समाज, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, धर्म, राज्यघटना, या विविध क्षेत्रांमध्ये बाबासाहेबांनी आयुष्यभर मूलगामी चिंतन करून त्यावर उपाय शोधून तो यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे. शोषण आणि शोषित हा त्यांच्या विचाराचा केंद्रबिंदू आहे. समाजाने दबून टाकलेल्यांना उभारी देण्याचे काम बाबासाहेबांनी केले आहे. शोषित समाजाचे त्याच जोखडातून त्यांची मुक्तता हा बाबासाहेबांच्या सामाजिक विचारांचा मुळ केंद्रबिंदू आहे. सर्वांना स्वातंत्र्य समता आणि न्याय मिळावा हा त्यांच्या वैचारिक मांडणीचा खरा हेतू आहे. डॉं. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकंदर कार्यात सामाजिक सुधारणांना विशेषतः दलितोध्दाराच्या गोष्टींना विशेष महत्व आहे. बाबासाहेब स्वतः एका अस्पृश्य कुटुंबात जन्माला आले. या समाजात त्यांना अत्यंत वाईट अनुभव आलेत. हे डोळ्यासमोर घेऊन त्यांनी अस्पृश्यता नष्ट करणे, आणि त्यांचा सर्वांगीण विकास करणे, ह्या आपल्या जीवन ध्येयाची खूणगाठ त्यांनी मनी भांडली होती. डॉं. बाबासाहेबांचे सफल जीवनाचे एक सूत्र होती की, "लक्षात ठेवा तलवारीच्या धारे पेक्षा लेखणीची धार कायम टिकणारी आणि सर्वात खतरनाक शस्त्र म्हणून तलवार हातात न घेता लेखणी हातात घेऊन अन्यायावर मात करा".१ बाबासाहेबांनी आपल्या लेखणीच्या जोरावर दलितांचे प्रेरणास्तोत्रे बनलेत, आपल्या लेखणीने देशाची राज्यघटना लिहिली, स्त्रीयांना 'हिंदू कोड' बिलाच्या माध्यमातून न्याय मिळवून समान हक्क प्राप्त करून दिलेत, शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न सोडवले, तमाम दीन-दलितांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. एवढी ताकद बाबासाहेबांच्या लिखणीईने करून दाखवली आणि समाजामध्ये परिवर्तन घडवून आणले.

डॉं. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील सर्व घटकांचे निरीक्षण करून त्यांनी आपल्या वेगवेगळ्या ग्रंथांमधून, वर्तमानपत्रातून, भाषणांमधून आणि विशेषता भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून सामाजिकतेची कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्य हा भारतीय समाज व्यवस्थेला लागलेला कलंक असून, अस्पृश्य व्यक्तीला माणूस म्हणून असलेले सर्व समतेचे अधिकार चातुर्वण्य व्यवस्थेने नाकारले होते. शतकानुशतके हा समाज दयनीय व अप्रगत अवस्थेत जीवन जगत होता, दलित माणसांना कुत्रे, मांजरी आधी प्राण्यांपेक्षा हिन दर्जाची वागणूक दिली जात होती. अनेक वर्षापासून त्यांना गुलामगिरीचे जोखड सहन करीत जीवनाचा प्रवास करावा लागत होता".२ म्हणजेच सामाजिक



Scanned by CamScanner

विषमतेचा प्रश्न सोडवायचा असेल तर आधी लहान-लहान सामाजिक सुधारणा होण्याची गरज आहे. नेमस्त सुधारकांनी सामाजिक सुधारणांसाठी धर्मग्रंथांचा आधार घेतला होता आणि याच धर्मग्रंथांवर बाबासाहेबांचा विश्वास नाही, म्हणून अस्पृश्यता मान्य करणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाची बाबासाहेबांनी होळी केली. त्याचबरोबर या नेमस्त धर्म सुधारकांचा हृदय परिवर्तनावर विश्वास होता. तर डॉ बाबासाहेबांचे असे मत आहे की, या हृदय परिवर्तनाला मर्यादा असतात, म्हणून अनेक वर्षे अन्याय, पिळवणूक, दारिद्र्य, यांच्या गर्तेत सापडलेल्या अस्पृश्य समाजाला यातून आपण बाहेर काढले पाहिजे अशी खुणगाठ डॉ. बाबासाहेबांनी मनाशी बाळगून आयुष्यभर त्याच्यासाठी झगडत राहिले, आणि अस्पृश्यांना न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या समाजसुधारणेचे व्रत अंगिकारले. त्यांच्या डोळ्यासमोर त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज, मेघाजी लोखंडे या थोर पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या हातून राहून गेलेले अपूर्ण स्वप्न साकार करून अस्पृश्यांच्या विकासाला चालना दिली आहे.

भारतीय समाजव्यवस्था ही जातीवर आधारित आहे. त्यामुळे व्यक्ती मध्ये भेद निर्माण झाले आहेत. भारत देश एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असतांना देखील समाज मात्र जातीपातीच्या चक्रव्युहामध्ये सापडला आहे. ही जातीव्यवस्था आता विभाजन करणारी असून ती व्यक्तीचा दर्जा श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशी दर्शविणाऱ्या आहे. यामुळे ही अस्पृश्यता जोपर्यंत मुळापासून नष्ट होत नाहीत तोपर्यंत तोपर्यंत समाजाची प्रगती होणार नाही. त्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संख्य प्रयत्न केले आहेत. या देशात माणसांची, माणसांच्या गुणांची, माणसांच्या कर्तृत्वाची कधीच पूजा झाली नाही. समाजात चालत आलेल्या रूढी परंपरेमुळे, धर्मामुळे, धर्माच्या रूढी मुळे, माणसातला माणूस हा शून्य समजला जातो आहे. त्याला पशूपेक्षाही हिन वागणूक दिली जाते. त्याच्यातील कलागुणांची, कर्तृत्वाची, कार्याची, दखल घेण्याऐवजी दगडधोंड्यांची, पशु-पक्ष्यांची, झाडपाल्याची पूजा करण्याची शिकवण आपला धर्म देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवन अनुभवाने आपल्या व्यासंगपूर्ण जातिव्यवस्थेच्या, वर्णव्यवस्थेच्या, वर्णाश्रम धर्माच्या, अस्पृश्यतेच्या सर्व प्रश्नाच्या मुळाशी खोलात जाऊन त्याचा सर्वांगाने अभ्यास केला. या देशाची अधोगती का होते आहे? माणूस मागे का पडत चालला आहे? तो का पराभूत होत आहे? या सगळ्या गोष्टींचा बारकाव्याने अभ्यास केला आणि बाबासाहेबांनी निष्कर्ष काढला, या सगळ्या गोष्टींचे मूळ मूळ फक्त माणूस. हा माणूस केंद्रबिंदू मांडल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. भारताचे भवितव्य उज्ज्वल होणार नाही. अशा निर्णयाप्रत येऊन बाबासाहेबांनी शूद्र मुळचे कोण? हे बाबासाहेबांनी लिखित पुस्तकाच्या प्रस्तावनेतील त्यांच्या विचारातून असे निदर्शनास येते की, भारतीय समाजव्यवस्थेत माणूस हा केंद्रबिंदू आणलेला नाही. हिंदू समाजव्यवस्थेतील जातीयता, अस्पृश्यता नष्ट करून, नवीन मूल्यांवर आधारलेला म्हणजेच समता, बंधुता व स्वातंत्र्य या तत्वावर आधारलेला नवसमाज निर्माण करायचा नव्हता. त्यामुळेच हिंदू समाजात जातीयता, अस्पृश्यता टिकून राहिली आहे. अस्पृश्यतेने समाजाच्या



Scanned by CamScanner

दैनंदिन व्यवहारात आपल्या भयानक स्वरूपाचे थैमान घातले व कोट्यवधी माणसे अस्पृश्याच्या गुलामगिरी दाबून टाकली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारण करण्यासाठी आयुष्यभर कष्ट केले, त्यांनी खाल्लेले दाहक चटके आणि वर्षानुवर्ष जातीभेदाची शिरा ज्यांच्या मानेवर ठेवली आहे, अज्ञानाने जखडलेल्या या अस्पृश्य समाजातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेबांचे कार्य मोलाचे आहे. अस्पृश्य समाजातील मानवाला हिंदू म्हणून धार्मिक, सामाजिक, समानता मिळावी या हेतूने बाबासाहेबांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यासाठी बाबासाहेबांनी नाशिक काळाराम मंदिर प्रवेश, चवदार तळ्याचा तळ्याचा सत्याग्रह, तसेच या अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदार संघ असावा, यासाठी अनेक लढे दिलेत आणि हे सर्व बाबासाहेबांनी यशस्वी केले.

१४ ऑक्टोंबर १९५६ रोजी आपल्या लाखो दलित, पददलित अस्पृश्यांसह सनातनी हिंदू धर्माचा त्याग समतावादी बौद्ध धर्माचा बाबासाहेबांनी स्वीकार केला. सर्व अस्पृश्यांना एकत्रित करून त्यांना स्वाभिमानाने जगता आले पाहिजे. याकरिता जातीव्यवस्था मोडून काढली पाहिजे, शिक्षणातून दलित अस्पृश्यांचा विकास व्हावा म्हणून त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था, वसतीगृहे यांची निर्मिती करून सामाजिक व राजकीय स्तरावर अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम तेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. महाडच्या सत्याग्रहाच्या सभेमध्ये डॉ. बाबासाहेबांनी दलितांचा जन्मसिद्ध मानवी हक्काचा जाहीरनामा दिनांक २५ डिसेंबर १९२७ रोजी तयार केला तो पुढील प्रमाणे,

"सर्व माणसे जन्मतः समान दर्जाची आहेत. ती मरेपर्यंत समान दर्जाचीच राहतील. हे हक्क कायम राहावेत हाच व्यवस्थेचा व राज्यव्यवस्थेचा अंतिम हेतू असला पाहिजे.

अखिल प्रजा, जनता हेच सर्व अधिकारांचे व सत्तेचे उगमस्थान आहे. कोणत्याही व्यक्तीला आपल्या जन्मसिद्ध हक्क प्रमाणे वागवण्यास स्वातंत्र्य आहे.

जाती-जातीतील ठरवून दिलेल्या असमान व्यवस्थेचाही सभा धिक्कार करते. समाज रचना समतेच्या पायावर उभी करावयची असल्यामुळे मान - सन्मान, अधिकार, व्यवसाय, यांच्या बाबतीत जात आड येता कामा नये. भेदाभेद व्हावयाचा तो केवळ व्यक्तीच्या गुणधर्मामुळे झाला पाहिजे, जातीमुळे होता कामा नये."३ अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून असे निदर्शनास येते की, वरील सर्व कौशल्य योग्य पद्धतीने वापरली तर देशासमोर निर्माण झालेले विविध प्रश्न सहजपणे सोडविणे सोपे जाईल व भारतीय लोकशाहीचे अस्तित्व दीर्घ काळ टिकून राहू शकते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या सामाजिक सुधारणा**

१. स्त्रीयांना पुरुषाप्रमाणे समान नागरी कायदा, स्त्रीयांना त्यांचे हक्क प्राप्त झाले पाहिजेत यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती करून स्त्रियांना त्यांचे हक्क प्राप्त करून दिलेत.



Scanned by CamScanner

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल हा कायदा फक्त दलित स्त्रीयां पुरताच मर्यादित नाही, तर समाजातील सर्व स्त्रीयांसाठी त्यांनी या कायद्याची निर्मिती करून सर्व स्त्रियांना उद्देश केला आहे. त्यांनी पतीचे गुलाम होण्यास नकार देऊन त्यांच्याशी मित्राप्रमाणे सहकार्य केले पाहिजे, लवकर लग्न करणे, अधिक मूल होऊ न देणे, दुर्गुणांपासून मुक्त राहणे, आणि समतेसाठी आग्रह धरणे महत्त्वाचे आहे स्त्रीला माणूस म्हणून मान-सन्मान मिळावा अशी स्पष्ट भूमिका डॉ. बाबासाहेबांनी या कायद्यात अधोरेखित करून मानवतावाद जोपासला आहे.

३. दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीन-दलितांच्या, श्रमिकांच्या, विस्थापितांच्या, शोषितांच्या, अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनातून समाज प्रगतीची मशाल चेतवून डॉ. आंबेडकरांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले, म्हणजेच बाबासाहेबांनी प्रत्येकाला मानवी हक्काची जाणीव करून दिली.

५. महिलांच्या आणि कामगारांच्या हक्काचे समर्थन करून त्यांना नोकरीच्या ठिकाणी योग्य सन्मान व वेतन प्राप्त करून दिले.

६. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोलाचे योगदान देऊन भारतीय संविधानाचे शिल्पकार बनले.

७. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागाळातील लोकांना बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय-अन्याय आपले हक्क ही आपल्याला कळत नाही अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंगे समाजात फुंकले आणि समाजाला एकसंघ समाजाची जाणीव करून दिली.

८. देशाचा विकास करायचा असेल तर शेती व्यवसायाला चालना दिली पाहिजे. आपला देश ग्रामीण भागातील जातीवर व समाज व्यवस्थेवर आधारलेला म्हणून शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, त्याला लागणाऱ्या सर्व सुविधांची निर्मिती करून शेतकऱ्याला मदत केली पाहिजे, अशा स्वरूपाचे कायदे बाबासाहेबांनी तयार करून शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचे काम

९. [illegible]मागासलेल्या वर्गाच्या निराशा दूर करून त्यांना समानतेचा अधिकार मिळवून दिला.

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारात राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा ओतप्रोत भरलेली आहे. त्यांनी जेव्हा धर्मांतराची घोषणा केली तेव्हा अनेक राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली आणि त्यांना असे वाटायला लागले की, डॉ. बाबासाहेब आता देश सोडून जाणार. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हांला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच,



Scanned by CamScanner

राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व करू सुद्धा." अशी प्रखर राष्ट्रनिष्ठा बाबासाहेबांना ते पाहायला मिळते.

११. डॉ. बाबासाहेबांनी तळागाळातील सर्वसामान्य माणूस सर्वशक्तीनिशी जागा केला. त्याला आत्मसन्मान, स्वाभिमान, अस्मिता, व सामर्थ्याची जाणीव करून दिली. मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले. हक्काने जगण्याची शिकवले. त्यासाठी संघर्षाचे सत्याग्रह करून समता व न्याय समाजात निर्माण केला.

१२. जगातील आदर्श समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी लोकशाही शासनाचा स्वीकार केला. त्यासाठी एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य, आणि एकच किंमत, असा सिद्धांत घालून दिला. यासाठी त्यांनी जगाला आणि भारताला आधुनिक काळात सर्व प्रकारच्या सुधारणा व सर्वांगीण विकास करता येईल अशी राष्ट्राला राज्यघटना दिली.

**सारांश**

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व समाजासाठी सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी आपल्या आयुष्याच्या ६५ वर्षात देशाला सामाजिक, आर्थिक, राजनितिक, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक, संविधानिक, सह वेगवेगळ्य क्षेत्रात अनेक मुल्यवान कामे करून राष्ट्राच्या निर्माणात योगदान दिले. भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, न्यायिक, सर्व प्रकारच्या प्रगतीमध्ये समान संधीचा अधिकार प्राप्त करून देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने महान समाज सुधारक ठरले.

**संदर्भ**

1. mr.wikipedia/wiki/ डॉं बाबासाहेब आंबेडकरांचे विचार- मुक्त ज्ञानकोश (कोटेशन १)
2. वर्तमान परिस्थितीत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आवश्यकता.-लेखक डॉ. एम. आर. इंगळे (कोटेशन क्रमांक २)
3. https://www.akshadhara.com डॉं. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार- Marathi book buy online. (Quotation-3)



Scanned by CamScanner